2005

बैठक क्र.

2 2 0 2 65

# 0101

# VSA (मराठी माध्यम)

**प्रश्नपत्रिका क्र. I** **भाषा (मराठी) व सामाजिकशास्त्रे** **वेळ : 11 A.M. ते 12 Noon**

**पृष्ठ : 10** **(इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल)** **एकूण गुण : 100**

**सूचना :—**

(1) या प्रश्नपत्रिकेमध्ये प्रत्येकी **दोन** गुणांचे **50** प्रश्न आहेत.

(2) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(3) उत्तरे लिहिण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेली आहे. प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी चार पर्याय दिलेले आहेत. पर्याय क्र. 1, 2, 3, 4 असे इंग्रजीत आहेत. त्यापैकी एकच पर्यायी उत्तर योग्य आहे. उत्तराचा योग्य पर्याय उत्तरपत्रिकेत चौकटीमध्ये इंग्रजी अंकात लिहावा. जसे [2].

(4) शक्यतो खाडाखोड करू नये.

(5) उत्तराची दुरुस्ती करताना चौकोनातील उत्तर क्रमांकावर [3] अशा प्रकारे तीन आडव्या रेषा माराव्या व बदललेल्या उत्तराचा पर्याय क्रमांक चौकोनापुढे उजव्या बाजूस लिहावा. जसे [3] 2.

(6) उत्तराची दुरुस्ती प्रत्येक प्रश्नासाठी एकदाच मान्य होईल.

(7) पाचपेक्षा जास्त दुरुस्त उत्तरे नोंदविल्यास अशा जादा दुरुस्त्यांना गुण दिले जाणार नाहीत.

(8) एखाद्या प्रश्नाचे उत्तर येत नसल्यास त्यासाठी रेंगाळू नका.

(9) प्रश्नपत्रिकेतील भाग **I** मध्ये **35** प्रश्न भाषेचे आहेत आणि भाग **II** मध्ये **15** प्रश्न सामाजिकशास्त्राचे (इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल) आहेत.

# भाग I

## भाषा (मराठी)

**प्र. 1 ते 3 : खालील उतारा वाचा. त्या खालील प्रश्नांच्या उत्तरांचे पर्याय क्रमांक लिहा :**

प्रतीक म्हणजे चिन्ह किंवा खूण. चार सिंहाची मुद्रा हे आपले राष्ट्रीय चिन्ह आहे. किंवा पंख पसरलेला गरुड हे अमेरिकेचे चिन्ह आहे. निळे धर्मचक्र असलेला तिरंगी झेंडा हे सुद्धा एक प्रकारचे चिन्ह झाले. अशा चिन्हांमधून काही अर्थ सुचवलेला असतो. जसे आपण लहानपणी शिकतो की झेंड्यामधला केशरी रंग त्यागाचा, पांढरा रंग शांततेचा तर हिरवा रंग समृद्धीचा. असा मोठा अर्थ ज्या चिन्हांमध्ये साठवलेला असतो त्याला 'प्रतीक' असे म्हणतात.

1. ज्या चिन्हांमध्ये मोठा अर्थ साठवलेला असतो त्याला काय म्हणतात ?

   (1) मुद्रा (2) चक्र

   (3) प्रतीक (4) झेंडा

2. कोणता रंग भरभराट दाखवतो ?

   (1) निळा (2) पांढरा

   (3) केशरी (4) हिरवा

3. या उताऱ्यातील आपली दोन राष्ट्रीय प्रतीके कोणती ?

   (1) राष्ट्रगीत व राष्ट्रध्वज

   (2) चार सिंहाची मुद्रा व तिरंगी झेंडा

   (3) ध्वजगीत व राष्ट्रगीत

   (4) राजमुद्रा व राष्ट्रगीत

**प्र. 4 ते 6 : खालील कविता वाचा व त्या खालील प्रश्नांच्या उत्तरांचे पर्याय क्रमांक लिहा :**

लावू रोपटे होईल झाड

पक्षी गातील पानाआड !

येतील फळे बहरतील फुले
झाडाखाली मग' खेळतील मुले !

ताजी शुद्ध मिळेल हवा
सुगंध फुलांचा घेऊ नवा !

वाहील वारा हसेल आभाळ
झाडा-फुलांचा करु सांभाळ !

ढग देतील पाणीच पाणी
पक्षी गातील सुरेल गाणी !

4. पानाआड कोण गातात ?

(1) मुले (2) पक्षी

(3) फुले (4) वारा

5. मुले कोठे खेळतात ?

(1) झाडाखाली (2) मैदानावर

(3) बागेत (4) अंगणात

6. आभाळ केंव्हा हसते ?

(1) पाऊस आल्यावर (2) वारा वाहिल्यावर

(3) ऊन पडल्यावर (4) ढग आल्यावर

7. खालीलपैकी कोणता शब्द नाम आहे ?

(1) सुंदर (2) छान

(3) फुलून (4) सौंदर्य

8. पुढील वाक्यातील सर्वनाम कोणते ?

'हे सुंदर चित्र बघ.'

(1) सुंदर (2) चित्र

(3) हे (4) बघ

9. "तुला कसली आली आहे अडचण ?" या वाक्यातील विरामचिन्हे ओळखा.

(1) अवतरणचिन्ह

(2) प्रश्नचिन्ह

(3) उद्‌गारचिन्ह

(4) अवतरणचिन्ह व प्रश्नचिन्ह

10. स्त्रीलिंगी शब्द ओळखा.

(1) सुनील (2) सुलभा

(3) सदाशिव (4) अश्विन

11. पुढील वाक्यातील विधेय कोणते ?

'राजीव गांधी भारताचे पंतप्रधान होते.'

(1) भारताचे पंतप्रधान (2) राजीव गांधी

(3) पंतप्रधान होते. (4) भारताचे पंतप्रधान होते.

12. शुद्‌ध शब्द कोणता ?

(1) स्वतः (2) स्वता

(3) स्वःता (4) स्वताः

13. शुद्‌ध वाक्य ओळखा.

(1) दौलताबादचे जुने नाव देवगीरी होय.

(2) दौलताबादचे जुने नाव देवगिरि होय.

(3) दौलताबादचे जुने नाव देवगिरी होय.

(4) दौलताबादचे जुने नाव देवगीरि होय.

14. समान अर्थ असलेली वाक्प्रचारांची जोडी कोणती ?

(1) नवल वाटणे—तोंड देणे

(2) कानोसा घेणे—कान फुंकणे

(3) कान निवणे—डोळे निवणे

(4) डोळेझाक करणे—कानामागे टाकणे

15. खालील चित्रासंबंधी आलेल्या म्हणीचा अर्थ असलेला पर्याय ओळखा :



(1) घागरीवर पाणी सोडणे

(2) घागर पालथी घालणे

(3) केलेला उपदेश वाया जाणे

(4) सर्वांशी विरुद्ध वागणे

**प्र. 16 ते 18 : खालील संवाद वाचून, त्या खाली विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरांचे पर्याय लिहा :**

"अरे सदा, झाले का झाडांना पाणी घालून ?"

"हो गुरुजी, आता काय करायचे ?"

"आता गावातील पाणवठ्यावर जायचे आहे. तेथे आपण पाण्याचे उपयोग व जलप्रदूषण कसे होते याची माहिती घेवू."

"नमस्कार गुरुजी."

"नमस्कार काका या"

"गुरुजी शाळेचे नंदनवन केले तुम्ही ! मुलांना कामात रमवलंत."

"मनापासून केलेल्या गोष्टीला सुंदर रुप येते काका."

"खरे सांगू गुरुजी, हे सर्व पाहिले की गुरुदेव टागोरांच्या शांतीनिकेतनची आठवण येते. चार वर्षापूर्वी हा चार भिंतीमधला कोंडवाडा होता. तुमच्या झटण्याला आज अर्थ आला." सरपंच म्हणाले.

16. गुरुजी 'पाणी' हा पाठ कोठे शिकविणार आहेत ?

(1) शाळेत (2) वर्गात

(3) पाणवठ्यावर (4) क्रीडांगणावर

17. वरील संवादात किती जणांनी भाग घेतला आहे ?

(1) दोन (2) तीन

(3) चार (4) पाच

18. वरील संवादात गुरुजींचा कोणता विशेष गुण दिसतो ?

(1) ते वर्गात अभ्यास घेतात

(2) विद्यार्थांकडून पाठांतर करुन घेतात

(3) शाळेत कार्यक्रम क़रतात

(4) मुलांना अनुभवातून शिक्षण देतात

19. मोठ्या भावास पत्र लिहिताना कोणता मायना लिहाल ?

(1) तीर्थस्वरूप (2) विनंती विशेष

(3) तीर्थरुप (4) श्रीमान

**प्र. 20 ते 22 : रिकाम्या जागी योग्य शब्द निवडून सुसंगत वाक्यांचा परिच्छेद तयार करा :**

20. सर्वजण ............... जमले.

(1) मंडपात (2) शाळेत

(3) वर्गात (4) मैदानावर

21. सर्वांच्या हातात .................... होत्या.

(1) वह्या (2) अक्षता

(3) गोट्या (4) घुंगुरकाठ्या

22. बाईंनी दिलेला .................... सर्वांनी लिहिला.

(1) उदाहरणे (2) निबंध

(3) कविता (4) सूचना

23. 'भ्रमर' या शब्दाला समानार्थी शब्द कोणता ?

(1) माशी (2) किडा

(3) भुंगा (4) कोश

24. 'लक्ष' या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) सुलक्ष (2) अलक्ष

(3) दुर्लक्ष (4) दक्ष

25. रिकाम्या चौकटीत कोणते अक्षर वापरावे म्हणजे उभ्या शब्दाचा अर्थ 'तोंड' आणि आडव्या शब्दाचा अर्थ 'घर' होईल.

| | | |
|---|---|---|
| | व | |
| स | | न |
| | न | |

(1) म (2) व

(3) च (4) द

26. पुढीलपैकी कोणता शब्द जोडशब्द नाही ?

(1) हवामान (2) कामधंदा

(3) तिखटमीठ (4) जाळपोळ

27. 'गाणे गाणारा' या शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.

(1) गीतकार (2) गायक

(3) वादक (4) संगीतकार

28. 'शोध लावणारा' या शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.

(1) संपादक (2) बातमीदार

(3) संशोधक (4) जादूगार

29. योग्य ध्वनीदर्शक शब्द ओळखा.

बेडकाचे ..................

(1) घुत्कारणे (2) घुमणे

(3) आरवणे (4) डरावणे

30. जसे छावा सिंहाचा तसे रेडकू कोणाचे ?

(1) म्हैस (2) गाय

(3) गाढव (4) मेंढी

31. खालील अक्षरांपासून एक अर्थपूर्ण शब्द बनतो त्या शब्दातील शेवटचे अक्षर कोणते ?

तां, ब, र, पी.

(1) तां (2) ब

(3) र (4) पी

32. 'पाऊलवाट' या शब्दातील अक्षरांपासून दोन अक्षरी किती अर्थपूर्ण शब्द तयार होतील ?

(1) आठ (2) सात

(3) पाच (4) सहा

33. खालील शब्द वर्णानुक्रमे लावल्यास प्रथम क्रमांकावर येणारा शब्द कोणता ?

कुंदा, मंदा, चंदा, नंदा.

(1) कुंदा (2) चंदा

(3) नंदा (4) मंदा

34. अधोरेखित शब्दाचा अर्थ ओळखा ?

दुकानदाराने गिऱ्हाईकाला साखरेचा भाव सांगितला.

(1) भक्ती (2) किंमत

(3) भावना (4) रुबाब

35. संत रामदासांचे नाव ...................... होते.

(1) केशव (2) माधव

(3) नारायण (4) तुकाराम

## भाग II

### सामाजिकशास्त्रे (इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल)

36. पंजाबात जाऊन समतेचा संदेश देणारे संत कोण ?

(1) संत ज्ञानेश्वर (2) संत नामदेव

(3) संत रामदास (4) संत एकनाथ

37. शिवनेरी किल्ला कोणत्या जिल्ह्यात आहे ?

(1) पुणे (2) अहमदनगर

(3) सातारा (4) रायगड

38. अफजलखानाचे वकील कोण होते ?

(1) सय्यद बंडा (2) कृष्णाजी भास्कर

(3) जिवा महाला (4) काझी हैदर

39. सुरत शहरावर छापा घालणाऱ्या राजाचे नाव कोणते ?

(1) शिवराय (2) औरंगजेब

(3) दिलेरखान (4) जयसिंग

40. शिवरायांनी राज्याभिषेकावेळी राजधानी म्हणून कोणत्या गडाची निवड केली ?

(1) प्रतापगड (2) रायगड

(3) पन्हाळगड (4) सिंहगड

41. शिवरायांच्या स्वराज्यात .................... सुभे होते.

(1) बारा (2) आठ

(3) वीस (4) तेवीस

42. धर्माच्या आधारावर नागरिकांमध्ये .................... केला जाऊ नये.

(1) एकोपा (2) सलोखा

(3) प्रेम (4) भेदभाव

43. सर्वांशी प्रेमाने व बंधुभावाने वागणे हे आपले .................... आहे.

(1) अधिकार (2) कर्तव्य

(3) हक्क (4) स्वातंत्र्य

44. आपल्या भारताची राजमुद्रा ............ येथील अशोक स्तंभावरुन घेतली आहे.

(1) वेरुळ (2) अंबरनाथ

(3) अजंठा (4) सारनाथ

45. महाराष्ट्र राज्याची निर्मिती ............. रोजी झाली.

(1) ३० मे १९६० (2) १५ ऑगस्ट १९४७

(3) २६ जानेवारी १९५० (4) १ मे १९६०

46. 'ताडोबा' हे राष्ट्रीय उद्यान कोणत्या जिल्ह्यात आहे ?

(1) अमरावती (2) नागपूर

(3) गोंदिया (4) चंद्रपूर

47. महाराष्ट्रात इतर पिकांपेक्षा कोणते पीक जास्त काढले जाते ?

(1) बाजरी (2) गहू

(3) भात (4) ज्वारी

48. नाशिकजवळ ............. येथे वीजनिर्मिती केली जाते.

(1) एकलहरे (2) फेकरी

(3) पारस (4) कोराडी

49. पठारावरील बहुतेक लोक सुती कपडे वापरतात कारण :

(1) पठारी भागात कमी पाऊस पडतो

(2) शेती हा मुख्य व्यवसाय आहे

(3) हवामान उष्ण आहे

(4) पठाराच्या आग्नेय भागात जास्त पाऊस पडतो

50. पृथ्वीचा उपग्रह कोणता ?

(1) सूर्य (2) चंद्र

(3) तारे (4) ग्रह

पीतांबर